दुरध्वनी क्र.२२८२१२३९
Tel.No.22821239

फॅक्स क्र.२२८२२३१२
Fax No.22822312

**महाराष्ट्र शासन**
**मत्स्यव्यवसाय विभाग**
तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००२
**Government of Maharashtra**
**Department of Fisheries**
Taraporevala Aquarium, Netaji Subhash Road, Mumbai 400 002

Web :- http://fisheries.adfmaharashtra.in
E-mail:- [illegible]

जा.क्र.मत्स्य/प्रशा/१५३१०२/२५६/२०१९

दि. ०७.१०.२०२१

**कार्यालयीन आदेश :-**

वाचा :- १. शा. नि., सा.प्र.वि.,क्र.अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि.२१.०९.२०१७
२. शा. नि., सा.प्र.वि.,क्र.अकंपा-१२१९/प्र.क्र.५६/आठ, दि.१०.०६.२०१९
व दिनांक ११.०९.२०१९

मत्स्यव्यवसाय विभागातील महाराष्ट्र मत्स्यसेवा गट-ड, अंतर्गत नियमित आस्थापनेवरील सरळसेवेची शिपाई या संवर्गातील सन २०२१ मधील रिक्त पदे अनुकंपा तत्वावर भरुन काढण्यासाठी खालील उमेदवारांना शिपाई या पदावर (वेतनश्रेणी सुधारीत वेतनस्तर S-१ १५०००-४७६०० ) मध्ये खालील अटी व शर्तींच्या अधिनस्त राहून त्यांचे नावासमोर रकाना क्र.०६ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अनुकंपाधारकाचे नाव | प्रवर्ग | कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे पद | नियुक्तीचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रदिप यशवंत सुभाने | अ. जमाती | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर | रिक्त पदी. |
| २ | श्री. मंगेश मधूकर सुपेकर | एन टी (बी) | शिपाई | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, पुणे | रिक्त पदी. |
| ३ | श्री. विवेक विकास गावडे | इमाव | शिपाई | आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई | रिक्त पदी. |
| ४ | श्री. स्वप्नील महादेव कदम | अ.जा. | शिपाई | मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मिरकरवाडा-रत्नागिरी | रिक्त पदी. |
| ५ | कु. मानसी प्रल्हाद शेटये | इमाव | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी | रिक्त पदी. |
| ६ | श्री. निलेश शशिकांत यादव | एन टी (बी) | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रत्नागिरी | रिक्त पदी. |
| ७ | श्रीमती नेहा अखिल राठोड | विजाअ | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नांदेड | रिक्त पदी. |
| ८ | श्री. रोहित रंगराव तिरपणकर | खुला | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, सांगली | रिक्त पदी. |
| ९ | श्री. पंकज दिलिप नार्वेकर | इमाव | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड | रिक्त पदी. |
| १०. | श्री. निखिल लक्ष्मण शिंदे | इमाव | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, अकोला | रिक्त पदी. |

..२..

(स्वाक्षरी) ७/१०/२१
उपआयुक्त मत्स्य (प्रशासन)
मत्स्यव्यवसाय विभाग
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | श्री. गौतम काशीनाथ कांबळे | अ.जा. | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, सांगली | रिक्त पदी. |
| १२ | कु. प्रतिक्षा मारुती काटकर | इमाव | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, कोल्हापूर | रिक्त पदी. |
| १३ | श्री. [illegible] अनिलराव हजारे | भजब | शिपाई | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा | रिक्त पदी. |
| १४ | श्री. श्रीकांत रमेश मांढरे | भजब | शिपाई | उपआयुक्त मत्स्यव्यवसाय आयुक्त मत्स्यव्यवसाय, नागपूर | रिक्त पदी. |
| १५ | श्री. आशिष दगडू गायकर | एनटी | शिपाई | आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, मुंबई | रिक्त पदी. |

सेवा शर्ती महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाच्या तरतूदीनुसार राहतील.

नियुक्तीच्या अटी व शर्ती

१. सदर नेमणुक ही पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असून कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता कर्मचाऱ्याला कामावरुन काढून टाकण्याचा अधिकार नियुक्ती अधिकारी यांचा आहे.
२. कामावर रुजू झाल्यापासून दोन महिन्याच्या आत पोलिस विभागाकडून चारित्र्य व वर्तुणुकीबाबत तपासणी अहवाल मागविण्यात येईल, सदर अहवाल समाधानकारक आवश्यक आहे. असा अहवाल असमाधानकारक आढळल्यास आपली सेवा शा.नि. सा.प्र.वि. परि. चापअ २०१२/प्र.क्र६३/१६-अ, दि.२६.०८.२०१४ नुसार तात्काळ काहीही कारण न दर्शविता सेवा समाप्त करण्यांत येईल.
३. नियुक्तीचे पदावर हजर झाल्यांनतर ते शासनाची सेवा करण्यास शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सक्षम वैद्यकिय प्राधिकाऱ्याकडून प्राप्त करुन घेवून ते तीन महिन्यांच्या आत नियुक्ती कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र./२६/११, मंत्रालय, मुंबई दिनांक ०२ जून २०१४ च्या अनुषंगाने आपल्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत स्वत:ची मत्ता व दायित्व यावद्दलची विवरणपत्रे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
५. मराठी भाषा व हिंदी भाषा १०० गुणांचा विषय घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उतीर्ण नसल्यास एतदर्थ मंडळाची मराठीव हिंदी भाषा परिक्षा उतीर्ण करावी लागेल.
६. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे क्रिमिलिअर प्रमाणपत्र लागू असलेल्या जात प्रवर्गांच्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी सादर करणे प्रकरणपरत्वे अनिवार्य राहील
७. **सामान्य प्रशासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१ जुलै,२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियम-२००५ नुसार) प्रतिज्ञापत्र भरणे बंधनकारक राहील.**
८. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ मधील तरतूदीनुसार सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या आत जात तपासणी वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागेल. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यांना दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील.
९. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वधारण शर्ती व अटी) तसेच इतर नियम जे शासकीय सेवेत प्रवेश करतांना लागू असतात तसेच वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या नियुक्त झालेल्या उमेदवाराला बंधनकारक राहील.
१०. नेमणुकीपूर्वी कोठेही शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नसल्यबाबतचे स्वत:चे प्रमाणपत्र रुजू होतांना कार्यालयास सादर करावे लागेल.

उपआयुक्त मत्स्य (प्रशासन)
मत्स्यव्यवसाय विभाग
महाराष्ट्र राज्य, मुंबई



Scanned by CamScanner

. महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. अंनियो-२००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ चे शासन निर्णयानुसार जे उमेदवार शासकीय आस्थापनेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त केले जाणार आहेत, अशा उमेदवारांना १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यास " नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू राहील. सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१२. नियुक्ती स्विकारल्यानंतर, ज्या उमेदवारांना त्यांचे पदांचे राजिनामा द्यावयाचा असेल, तर तशी पूर्वसूचना एक महिना आगाऊ नियुक्ती कार्यालयास द्यावी लागेल. अन्यथा त्यांना मिळत असलेल्या एक महिन्याच्या मुळ वेतनाएवढी रक्कम शासन कोषागारात भरणा करणे बंधनकारक राहील. सदरहू रकमेचा भरणा शासन कोषागारात केल्याशिवाय त्यांना कार्यमुक्त केले जाणार नाही.

१३. नियुक्ती झालेल्या उमेदवारांना सविस्तर नियुक्तीचे आदेशाचे दिनांकापासून ३० दिवसाचे आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्या उमेदवाराचा नियुक्तीबाबतचा हक्क रद्द समजण्यांत येऊन हे आदेश आपोआपच रद्द होईल.

१४. नियुक्तीच्या पदावर रुजू होते वेळी आपण धारण केलेली शैक्षणिक अर्हता, जन्म दिनांक व तद्नुषंगाने आवश्यक कागदपत्रे मुळ प्रतीत विभागास सादर करणे अनिवार्य राहील.

१५. नियुक्ती संदर्भात भविष्यात न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास, न्यायालयाचे निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल व ती संबधितास बंधनकारक राहील.

१६. नियुक्ती उमेदवाराची बदली पदांच्या उपलब्धतेनुसार शासन हितार्थ महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही केव्हाही होऊ शकेल.

१७. प्रथम नियुक्तीच्या पदावर हजर होताना त्यांना कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता व इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

१८. नियुक्ती दिलेल्या कार्यालयाने पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू करुन घेताना आवश्यक त्या अटी व शर्तीचे तसेच आवश्यक प्रमाणपत्रांची पुर्तता करुन घेणे तसेच उमेदवारांचे अर्हतेसंबंधीत व इतर आवश्यक मुळ दस्ताऐवज पडताळणी करुन व सर्व आवश्यक मुळ प्रमाणपत्राची योग्यता तपासून शासन निर्णयानुसार खातर जमा करुनच संबंधित उमेदवारांना सेवेत रुजू करुन घेण्याची दक्षता घ्यावी.

सदरचे आदेश त्वरित अंमलात येतील.

(अतुल पाटणे)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. प्रदिप यशवंत शुभाने | मु. धुमकेत पो. चंडिगाव, ता. डहाणु, जि. ठाणे- पालघर |
| २ | श्री. मंगेश मधूकर सुपेकर | रा. साडे सतरा नळी, सर्व्हे नं. २०३, हडपसर, पुणे-२८ |
| ३ | श्री. विवेक विकास गावडे | भाटकर वाडी, मिऱ्या ता.जि. रत्नागिरी |
| ४ | श्री. स्वप्नील महादेव कदम | ठ.ब.सु.४७, रा. हरचिरी, ता.जि. रत्नागिरी |
| ५ | कु. मानसी प्रल्हाद शेटये | जे.के.फाईल्स समोर, केशव नगर, रत्नागिरी |
| ६ | श्री. निलेश शशिकांत यादव | रा. निवे बुद्रूक ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी |
| ७ | श्रीमती नेहा अखिल राठोड | मु. पो. गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड |
| ८ | श्री. रोहित रंगराव तिरपणकर | रा. ४५६ त्रिमुर्ती गल्ली, लक्षतिर्थ वसाहत, फुलेवाडी, कोल्हापूर |

उपआयुक्त मत्स्य (प्रशासन)
मत्स्यव्यवसाय विभाग
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. पंकज दिलिप नार्वेकर | १० ई. विंग क्षितिज अपार्टमेंट ८० फुटी हायवे, रत्नागिरी |
| १०. | श्री. निखिल लक्ष्मण शिंदे | महाकाली नगर, ११ नं शाळेच्या पाठीमागे हरिहर पेठ, जुने शहर अकोला |
| ११ | श्री. गौतम काशीनाथ कांबळे | मु. पो. म्हाळुंगे ता. करवीर जि. कोल्हापूर |
| १२ | कु. प्रतिक्षा मारुती कातकर | रा. १५१२/३८ अ वार्ड,दत्तगिरी नगर, सुर्वेनगर, कळंबा रिंग रोड, कोल्हापूर ४१६००७ |
| १३ | श्री. यश अनिलराव हजारे | म्हाडा कॉलनी सेवाग्राम जि. वर्धा |
| १४ | श्री. श्रीकांत रमेश मांडरे | रा. कारगाव ता. भिवापूर जि. नागपूर |
| १५ | श्री. आशिष दगडू गायकर | बी-२३ रूम नं.०१ चिंतामणी को. ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड, सेक्टर २६ वाशी नवी मुंबई ४०० ७०३ |

प्रत :

१. सहआयुक्त मत्स्यव्यवसाय (भूजल/सागरी/निपास), आयुक्त कार्यालय, मुंबई.
२. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर/लातूर
३. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय सिंधुदुर्ग-मालवण/रत्नागिरी/ रायगड/नांदेड/अमरावती/ सांगली/कोल्हापूर /पुणे/नागपुर/अकोला/वर्धा
४. अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा, मुंबई
५. कोषागार/उपकोषागार कार्यालय, सिंधुदुर्ग-मालवण/रत्नागिरी/ रायगड/नांदेड/अमरावती/ सांगली/कोल्हापूर /पुणे/नागपुर/अकोला/वर्धा
६. मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, मिरकरवाडा, जि. रत्नागिरी
७ कार्यासन अधिकारी, का.क्र. १४,१५(गो.अ/से.पु/रिक्तपद/बिं.ना./नि.लि./आ.धा./)

<u>प्रतिलिपी-</u> उपसचिव (मत्स्य), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.

<u>प्रति :-</u>

सर्व कार्यालय प्रमुखांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे नियुक्त झालेल्या उमेदावांनाचे नाव संबधीत जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सामाईक प्रतिक्षा सुचीमधून वगळण्याबाबत आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

उपआयुक्त मत्स्य (प्रशासन)
मत्स्यव्यवसाय विभाग
महाराष्ट्र राज्य, मुंबई

Scanned by CamScanner